Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIII Issue –V September – October 2024

# दशनाम गोसावी समाजाचा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास

संशोधिका
**पुरी सुजाता नवनाथ**
पीएच. डी.
समाजशास्त्र विभाग

मार्गदर्शक
**डॉ. मस्के दिलीप सिताराम**
(समाजशास्त्र विभाग प्रमुख)
वेणुताई चव्हाण प्रतिष्ठाण संचलित
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड.

➢ **प्रस्तावना :**

भारतीय समाजाचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, भारतात प्राचीन काळापासून जाती व्यवस्था अस्तित्त्वात होती परंतु तिला समाज संरचनेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या जातीसंस्थेत कालांतराने अनेक जाती व पोटजाती मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. त्यामुळे भारतीय समाज वेगवेगळ्या जाती व पोटजातीमध्ये विभागलेला आपणास दिसून येतो. या जातीची श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ स्वरूपाची श्रेणी रचना आहे. जातीव्यवस्थेत श्रेष्ठ जातींना सार्वजनिक व्यवहारात पूर्णपणे व्यक्तीस्वातंत्र्य होते. मध्यम दर्जाच्या जातींना काही प्रमाणात व्यक्तिस्वातंत्र्य होते. परंतु कनिष्ठ जातीची स्थिती अत्यंत दयनिय होती. कनिष्ठ जातींना व्यक्तिस्वातंत्र्य नव्हते तसेच कनिष्ठ जातींना सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक निर्बंध मोठ्या प्रमाणावर लादलेले होते. या प्रत्येक जातीचा एक व्यवसाय होता. तो व्यवसाय त्या जातीने करणे बंधनकारकच होते.

CC BY Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

प्रत्येक जातीने ठरल्याप्रमाणे आपल्या जातीचा व्यवसाय करावा असे सामाजिक बंधनच होते. आपल्या जातीचा व्यवसाय सोडून दुसऱ्या जातीचा व्यवसाय करता येत नसे. परंतु एखाद्या वेळेस दुसऱ्या जातीने व्यवसाय केला तर मोठ्या प्रमाणावर संघर्ष घडून येत असे. या अत्यंत कठोर नियमामुळे जातीमध्ये अनेक उपजाती निर्माण झाल्या. या सर्व जातींना निश्चित अशा व्यवसायाशी बंदीस्तपणे जोडण्यात आले. व्यक्तीच्या व्यवसायावरून व्यक्तीची जात ठरविल्या जात असे किंवा व्यक्तीच्या व्यवसायावरून

जातीची नावे प्रचलित झाली जसे की, गोंधळी, गवळी, माळी, सुतार, तेली, तांबोळी, कुंभार, चांभार, गुरव, कासार, सोनार इत्यादी. या जाती व्यवस्थेमधील गोसावी ही एक जात आहे आणि या जातीतील दशनाम गोसावी ही एक पोटजात आहे. दशनाम गोसावी समाजाची स्थापना अद्यगुरु शंकराचार्य यांनी केली. दशनाम गोसावी हिंदू धर्मातील शैवपंथी असून शिवभक्त आहे. दशनाम गोसावी समाजाची धर्म रचना प्राचीन शिव परंपरेवर आधारित असून ते धर्मरक्षक आहेत. शंकराचार्यांनी आपल्या शिष्यापैकी दहा शिष्यांना हिंदू धर्म प्रसाराची वेगळी कामे देऊन त्यांना वेगवेगळी नावे दिली. शंकराचार्यांनी दिलेली नावे दशनाम गोसावी समाजातील व्यक्ती आडनाव म्हणून वापरीत आहे. ही दहा आडनावे असणाऱ्या व्यक्तीचा समूदाय म्हणजेच दशनाम गोसावी समाज होय. दशनाम गोसावी समाज प्राचीन काळापासून भटकंती करणारी जात म्हणून ओळखली जाते. या जातीला स्वत:चे गाव नव्हते, स्वत:ची शेती व व्यवसाय नव्हता. भटकंतीमुळे पशुपालन करता येत नव्हते. गोसावी समाज गावकुसाबाहेर, रस्त्याच्या कडेला अथवा माळरानावर पाल टाकून राहत असे. त्यांना पालामधील समाज, भटका समाज म्हणून ओळखले जात असे. या समाजाला गावातही हिन दर्जाची वागणूक मिळत होती. भटकंतीमुळे या समाजाला आपले सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अस्तित्त्व निर्माण करता आले नाही. हा समाज आपली उपजिविका भिक्षा मागून, मजूरी, शिकार करून करीत असे. ह्या समाजाच्या लोकांचा दारीद्र्यातच जन्म आणि मृत्यू होत असे. ह्या समाजावर धर्माच्या विचाराचे वर्चस्व होते त्यामुळे त्यांच्यामध्ये दैववाद व अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात होती.

भारतीय स्वातंत्र्यानंतर या समाजाची भटकंती अवस्था काही प्रमाणात कमी होऊन ते गाव, खेडे, वस्ती, शहर या ठिकाणी स्थायी स्वरूपाचे जीवन जगू लागले. आधुनिक काळात दशनाम गोसावी समाजाची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक विकास घडून आलेला दिसून येतो. अशा मागासलेल्या अल्पसंख्यांक दशनाम गोसावी समाजाचा २१ व्या शतकात कौटूंबिक परिस्थिती, त्यांचा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दर्जाचा अभ्यास करणे हा संशोधनाचा मुळ उद्देश आहे.

➢ **संशोधनाची उद्दिष्टे :**

१) दशनाम गोसावी जातीच्या परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) दशनाम गोसावी जातीच्या आर्थिक दर्जाचे अध्ययन करणे.

३) दशनाम गोसावी जातीच्या शैक्षणिक जीवनाचा अभ्यास करणे.

➢ **संशोधनाची गृहितकृत्ये :**

१) दशनाम गोसावी जातीच्या सामाजिक स्थिती मागासलेली आहे.

२) दशनाम गोसावी जातीची आर्थिक स्थिती मागासलेली आहे.

३) दशनाम गोसावी जात ही शैक्षणिक दृष्टीने मागासलेली आहे.

➢ **संशोधन समस्येची मर्यादा :**

१) अहमदनगर जिल्ह्यातील दशनाम गोसावी समाजापुरते मर्यादीत आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे दशनाम गोसावी समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीशी मर्यादीत आहे.

➢ **न्यादर्श निवड पद्धत :**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सहेतूक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला.

➢ **संशोधनासाठी न्यादर्श निवड :**

संशोधन कार्यादरम्यान न्यादर्श निवडीसाठी अहमदनगर जिल्ह्यातील १४ तालुक्यातून दशनाम गोसावी जातीच्या १४० व्यक्तीची सहेतूक नमूना निवड पद्धतीने नमूना म्हणून निवड करण्यात आली ह्या नमुना निवडीमध्ये ७० स्त्रिया व ७० पुरुष नमुना म्हणून निवडण्यात आले. नमूना निवडीकरीता खालील निकष वापरण्यात आले.

१) ग्रामीण व शहरी भागातील दशनाम गोसावी जातीचे स्त्री-पुरुष.

२) सामाजिक व राजकीय सहभाग देणारे स्त्री-पुरुष.

३) शिक्षित, अशिक्षित, नोकरी, व्यवसाय करणारे व न करणारे स्त्री-पुरुष.

अहमदनगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून स्त्री-पुरुषांची निवड केली अशा एकूण १४ x १० = १४० स्त्री- पुरुषांची नमूना म्हणून निवड करण्यात आली.

➢ **तथ्य संकलन :**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा अवलंब पुढील प्रमाणे करण्यात आला.

**अ) प्राथमिक स्रोत :** प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक तथ्य संकलनासाठी प्रश्नावली व मुलाखत-अनुसुची ही प्रमुख साधने वापरण्यात आली. तसेच मुलाखत - अनुसूचीमध्ये बंदिस्त व खुल्या अशा मिश्र स्वरूपातील मुलाखत-अनुसूची या तंत्राचा अवलंब करण्यात आला. मुलाखत-अनुसूची म्हणजे लिखित प्रश्नांची यादीच होय.

**ब) दुय्यम स्रोत :** प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी प्रकाशित करण्यात आले. अप्रकाशित लिखित साहित्याचा उपयोग दुय्यम स्रोतामध्ये करण्यात आला. प्रकाशित साहित्यात विविध संदर्भ ग्रंथ, खाजगी, शासकीय, निमशासकीय संस्थांनी प्रकाशित केलेले अहवाल. शासनाचे रिपोर्ट, शासकीय गॅझेटर, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, संशोधन पत्रिका इ. अवलंब करण्यात आला. तर अप्रकाशित साहित्यामध्ये एम. फिल., पीएच. डी. चे प्रबंध शासकीय रेकॉर्ड, इंटरनेट इत्यादीचा उपयोग करण्यात आला.

➢ **संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या कार्यासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक संबोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे. वर्णनात्मक आराखड्यामध्ये वैज्ञानिक तंत्राचा उपयोग करून तथ्य संकलन करण्यात आले.

➢ **तथ्य विश्लेषण :**

प्रस्तुत संशोधनात सारणीबद्ध झालेल्या तथ्यातील अंतर्भूत असणारे सत्य अर्थ स्पष्ट करण्यासाठी तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले. नंतर तथ्याचे निर्वचन करून समोर आलेल्या निष्कर्षांची मांडणी करण्यात आली.

➢ **अध्ययनाचे महत्त्व :**

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व खालील बाबीवरून लक्षात येते.

१) सदरील संशोधनामुळे दशनाम गोसावी जातीची सामाजिक स्थिती मागासलेली आहे हे सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी व शासन यांच्या निदर्शनास येईल.

२) प्रस्तुत संशोधनामुळे दशनाम गोसावी जातीला स्वत:ची ओळख आणि अस्तित्त्वाची जाणिव होईल. त्यांना आपल्या जातीची वास्तविक स्थिती लक्षात येईल.

३) प्रस्तुत संशोधनामुळे दशनाम गोसावी समाजामध्ये विकासात्मक दृष्टीकोनातून सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संघटन घडून येईल.

➢ **निष्कर्ष :**

प्रस्तुत संशोधन करीत असताना संशोधकाने संशोधन प्रबंधामध्ये विविध प्रकरणांचा समावेश करण्यात आला. तसेच विविध प्रकरणात मांडण्यात आलेल्या तथ्यांच्या आधारे समोर आलेल्या निष्कर्षांची मांडणी करण्यात आली.

१) दशनाम गोसावी समाजाची सामाजिक स्थिती मागासलेली आहे.

२) दशनाम गोसावी समाजाचा विवाह संबंधी वैचारिक दृष्टीकोन निर्माण झाला आहे. ते विवाह करताना मुलां-मुलींची पसंती त्यांचे शिक्षण, व्यवसाय, नोकरी, स्थावर मालमत्ता या घटकांना प्राधान्य देत आहेत. तसेच या समाजातील बहूतांश लोकांनी आंतरजातीय विवाह विधवा पुर्नविवाहाचा पुरस्कार केला आहे.

३) दशनाम गोसावी समाजात धर्म आणि धार्मिक कर्मकांड यासंबंधी तार्किक दृष्टीकोन निर्माण झाला असून या समाजातील (६६.०० टक्के) लोकांचा स्वर्ग-नरक, पाप-पुण्य, मोक्ष, पुनर्जन्म, धार्मिक ग्रंथातील अख्यायिका, देव देवतांचे नवस, उपवास यावर विश्वास नाही.

४) दशनाम गोसावी समाजाचा रुढी, प्रथा, परंपरा संबंधी वैचारिक दृष्टीकोन निर्माण झाला आहे. या समाजातील (९०.६६ टक्के) लोक स्त्री-पुरुष, मुलगा-मुलगी, स्पृश्य-अस्पृश्य यांच्यातील श्रेष्ठ-कनिष्ठ दर्जा व भेदभाव यांना विरोध करीत आहेत.

५) दशनाम गोसावी समाजातील (९४.०० टक्के) लोक भिक्षा मागणे, देव देवतापुढे पशुहत्या, जातीची बंधने, बालविवाह, शुभ-अशुभ या प्रथा, परंपरांना विरोध करीत आहेत.

६) दशनाम गोसावी समाजाचा सामाजिक कार्यक्रमातील सहभाग कमी असला तरी या समाजातील (५६.६६ टक्के) लोक सांस्कृतिक, अंधश्रद्धा निर्मूलन, सण उत्सव, जयंती या कार्यक्रमात सहभाग घेत आहेत.

७) दशनाम गोसावी समाजाचे सामाजिक कार्यक्रमाच्या निर्णय प्रक्रियेतील प्रमाण कमी असून या समाजातील (५०.०० टक्के) लोक कोणत्याही सामाजिक कार्यक्रमाचे नेतृत्त्व करीत नाहीत.

८) दशनाम गोसावी समाजाला सामाजिक विकास प्रक्रियेची जाणीव झाली असल्यामुळे या समाजातील (८१.३४ टक्के) लोक सामाजिक सहभागातून व्यसनमुक्ती, झुगारबंदी, तंटामुक्ती, धार्मिक अंधश्रद्धा, धार्मिक कर्मकांड, अनिष्ठ प्रथा यांच्या निर्मूलनाचे कार्य करीत आहेत.

९) दशनाम गोसावी समाजाचा सांस्कृतिक दर्जा उंचावला असून या समाजातील (८६.०० टक्के) व्यक्तींनी विकसित समाजाची जीवन पद्धती स्विकारली आहे.

१०) दशनाम गोसावी जातीच्या संघटना, मंडळे, संघ स्थापन झाले आहेत. ते जातीच्या विकासाकरीता कार्य करीत आहेत. परंतु या संघटना, मंडळे, संघ यामध्ये जातीचे लोक मोठ्या प्रमाणात सक्रिय सहभाग नोंदवित नाहीत. त्यामुळे संघटना, मंडळे, संघ याचे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात प्रभूत्व निर्माण झालेले नाही.

११) दशनाम गोसावी समाजातील (६२.०० टक्के) लोकांना शैक्षणिक, नोकरी, राजकीय, आर्थिक विकासात्मक योजना इत्यादी मधील आरक्षणासंबंधी परिपूर्ण माहिती नसल्यामुळे (६२.६६ टक्के) व्यक्ती आरक्षणाच्या लाभापासून वंचित आहेत.

१२) दशनाम गोसावी समाजाच्या राजकीय प्रतिनिधीवर पक्ष प्रमुख, विरोधी गट, वरिष्ठ नेते यांच्या दबावतंत्राचा अवलंब होत आहे. त्यांना राजकीय पदाचे निर्णय स्वइच्छेप्रमाणे घेता येत नाहीत.

१३) दशनाम गोसावी समाजाला शासनाच्या आर्थिक योजनांसंबंधी माहिती नाही. त्यांना योजनाकरीता आवश्यक असणारे कागदपत्रे मिळत नाहीत. त्यांना शासकीय अधिकारी मदत करीत नाहीत. योजनासंबंधी होत असलेला भष्ट्राचार, लाचलूचपत या समस्या मुळे दशनाम गोसावी समाजातील (६२.६६ टक्के) लोक शासनाच्या आर्थिक विकासात्मक योजना पासून वंचित आहेत.

१४) दशनाम गोसावी समाजाला नवीन व्यवसाय सुरु करताना जागा, व्यवसायाचा अनुभव, व्यवसायाचे ज्ञान आर्थिक रक्कम ह्या समस्या मोठ्या प्रमाणात जाणवतात.

१५) दशनाम गोसावी समाजाला आर्थिक बचतीचे महत्त्व पटले असून या समाजातील (९१.०० टक्के) लोक बँक, बचतगट, लघुउद्योग यामध्ये गुंतवणुक करीत आहेत.

प्रस्तुत निष्कर्षांना अनुसरुन पुढीलप्रमाणे काही महत्त्वपूर्ण शिफारशी करण्यात आल्या आहेत.

➢ **शिफारशी :**

१) दशनाम गोसावी समाजाची शैक्षणिक खर्चाची आर्थिक समस्या सोडविण्याकरीता समाजातील स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था, आर्थिक सहाय्यता मंडळे, उद्योगपती यांनी शैक्षणिक आर्थिक मदत करावी.

२) दशनाम गोसावी समाजाचा सामाजिक सहभाग वाढविण्याकरीता व त्यांचा सामाजिक दर्जा उंचविण्यासाठी प्रबळ जाती, धर्माच्या व्यक्तींनी बंधू-भाव, जाती व धर्म निरपेक्षता, सामाजिक एकात्मतेचा दृष्टीकोन बाळगावा.

३) दशनाम गोसावी समाजाने कौटूंबिक विकासाकरीता कुटूंबातील सदस्यांना व्यक्ती स्वातंत्र्य देऊन त्यांना शिक्षण, नोकरी, उद्योग, व्यवसाय नेतृत्त्व याकरीता प्रोत्साहन द्यावे.

४) दशनाम गोसावी समाजाने आपले सामाजिक अस्तित्त्व निर्माण करण्याकरीता स्वत: सामाजिक कार्यक्रमाच्या निर्णय प्रक्रियेत सहभाग घ्यावा. तसेच सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन आणि नेतृत्त्व करावे.

५) शासनाने अल्पसंख्यांक व मागासलेल्या जाती, जमातींवर दबावतंत्र निर्माण करणाऱ्या व्यक्तीसंबंधी कठोर कायद्याची तरतूद करावी.

६) दशनाम गोसावी समाजाने आधुनिक विकसित संस्कृतीचा स्विकार करीत असताना आपली जातीय एकात्मता, सहकार्य, संघटन टिकवून ठेवण्याकरीता आपले सण, उत्सव, धार्मिक कार्यक्रम यांची जोपासना करावी.

७) दशनाम गोसावी समाजातील सुशिक्षित व्यक्ती, तरूण यांनी आपल्या जातीतील धार्मिक कर्मकांड, अंधश्रद्ध, व्यसनाधिनता, अनिष्ठ प्रथा यांच्या निर्मूलनाकरीता पुढाकार घेऊन कार्य करावे.

८) दशनाम गोसावी समाजाला शैक्षणिक, नोकरी, राजकीय, आर्थिक विकासात्मक योजना इत्यादी मधील आरक्षणाचे स्वरूप व अधिकार यांची माहिती देण्याकरीता जातीतील सामाजिक कार्यकर्त्यांनी आरक्षण आणि अधिकार यासंबंधी मेळावे घ्यावेत.

९) दशनाम गोसावी जातीच्या संघटना, मंडळे, संघ, लोकप्रतिनिधी यांनी जातीतील निरक्षर, गरीब व्यक्तींना शासनाच्या विकासात्मक योजना मिळवून देण्याचे कार्य करावे.

१०) दशनाम गोसावी समाजातील बहुसंख्य लोक दारिद्र्यात जीवन जगत आहेत. त्यांच्या आर्थिक विकासाकरीता समाजातील स्वयंसेवी संस्था, सेवाभावी संस्था, जातीय संघटना यांनी आर्थिक मदत करावी.

➢ **संदर्भ ग्रंथसूची :**

१) आगलावे, प्र. (२०००), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर : विद्या प्रकाशन.

२) पंडीत, ब. बी. (१९८७), शिक्षणातील संशोधन पद्धती (प्र.आ.) पुणे : नित्यनुतन प्रकाशन.

३) www.onlineshodhganga.in